	प्राथमिक आरोग्य केंद्र कळसुली	
	ई.मेल :- phckalsulisindhu@gmail.com	
	जा.क्र.प्राआकेंक/आस्था/२१२/2026 दि. 23/10/2026	

दरपत्रक मागणी

प्राथमिक आरोग्य केंद्र कळसुली ता.कणकवली अंतर्गत सन 2026 - 2027 मध्ये प्रशिक्षण व मिटींग कार्यक्रमा करिता जेवण व चहा, नाश्ताची व्यवस्था उपलब्ध करुन देणेकरिता खालीलनमुन्यांत बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अ. क्र.	तपशिल	वर्णन / प्रमाण	दर रुपये
1	चहा साधा	75 मिली.	
2	चहा स्पेशल	75 मिली.	
3	अल्पोपहार शिरा गोड/उपिट/कांदा पोहे / समोसा/ वडा पाव/साबू वडा/साबू खिचडी/ इडली चटणी/इडली सांभार / पाव भाजी /आंबोळी चटणी मिसळ / मेदू वडा/ दहीवडा	150 ते 200 ग्रॅम	
4	शाकाहारी जेवण साधे (मर्यादीत)	3 चपात्या, दोन मुद भात, प्रत्येकी 1 वाटी वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर	
5	शाकाहारी जेवण साधे (अमर्यादीत)	चपात्या, भात, वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर खाईल तेवढे	
6	शाकाहारी स्पेशल जेवण (मर्यादीत)	3 चपात्या / 5 पु-या, दोन मुद मसाला भात, प्रत्येकी 1 वाटी वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर व स्वीट डिश पैकी गुलाब जाम / श्रीखंड / बासुंदी / जिलेबी / रस मलाई / रस गुल्ले	
7	शाकाहारी स्पेशल जेवण (अमर्यादीत)	चपात्या / पु-या, मसाला भात, वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर व स्वीट डिश पैकी गुलाब जाम / श्री ब्रंड / बासुंदी / जिलेबी / रस मलाई / रस गुल्ले खाईल तेवढे	
8	चिकन बिर्याणी	पाव किलो	
9	मच्छी जेवण (मर्यादीत)	दोन मुद भात, मासा तळलेला, मासा आमटी गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी	
10	मच्छी जेवण (अमर्यादीत)	गरजेनुसार भात, मासा तळलेला, मासा आमटी गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी	
11	चिकन जेवण (मर्यादीत)	3 पुरी, दोन मुद भात, सुके चिकन 1 वाटी, चिकन रस्सा गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी	
12	चिकन जेवण (अमर्यादीत)	पुरी, भात, सुके चिकन, चिकन रस्सा गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी	
13	व्हेज पुलाव (पाव किलो)	पाव किलो	

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेपासून 8 दिवसापर्यन्त पर्यन्त दुपारी 3 वाजेपर्यन्त विहीत नमून्यांत परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करून अटी व शर्ती पुर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकाला पुरवठा आदेश देणेत येईल.

वैद्यकिय अधिकारी गट – अ
प्राथमिक आरोग्य केंद्र कळसुली
ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner

1) अन्न पदार्थ तयार करणे, पदार्थ वाढणेसाठी आवश्यक भांडी इत्यादी याची व्यवस्था पुरवठादारानेच करावयाची आहेत. तसेच जेवण / नाष्टयानंतरची त्याठिकाणची साफसफाई पुरवठादाराने करावयाची आहे.
2) सर्व अन्नपदार्थांचा दर्जा व चव उत्तम असावी. तसेच सर्व पदार्थ ताजे असावेत.
3) कोणतीही एक किवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार राखून ठेवला आहे.
4) कार्यक्रमापुर्वी एक किंवा दोन दिवस आगावू कल्पना दिली जाईल त्यानुसार व्यवस्था करावयाची आहे.विहीत मुदती पुरवठा न केल्यास तसेच मंजुर दरपत्रक धारकाने पुरविलेला माल अथवा मालाचा भाग वापरानंतर निकृष्ठ दर्जाचा आढळलेस महाराष्ट्र शासन यांच्या 1 डिसेंबर 2016 च्या शासन निर्णयातील परिच्छेद 4 .5.2 नुसार होणा-या दंडाची रक्कम पुरवठाधारकाकडुन वसुल केली जाईल त्याबाबत कोणतिही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.
5) जेवण/चहा/नाष्टाचे देयक NEFT/PFMS DBT प्रणालीद्वारे संबधीत मक्तेदाराच्या खातेवर जमा केले जाईल.
6) ठरवून दिलेल्या वेळेत खाद्य पदार्थ दरपत्रकात नमूद वर्णनानुसार व दरानुसार देणे आवश्यक आहे.
7) पुरवठादाराने दरपत्रक सादर करताना कोणतीही अट घालावयाची नाही.
8) ज्या पुरवठादाराची निविदा मंजूर केली आहे त्यांनी वरील सर्व अटींचे पालन न केल्यास कोणतीही सूचना न देता मक्ता रद्द करण्यात येईल.
9) दरपत्रक सादर करणा-या मक्तेदारांनी आपल्या दुकान/संस्था नोंदणी दाखला (उदा. नगरपरिषद/ग्रामपंचायत नोंदणी अथवा जीएसटी नोंदणी दाखला) , अन्न व भेसळ प्रमाणपत्र तसेच नोंदणी पत्रकावर नमुद मालकाच्या पॅन कार्ड अथवा संस्थेच्या पॅन कार्ड ची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.

संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून 8 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.

दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण

1. www.nrhm.maharashtra.gov.in
2. www.arogya.maharashtra.gov.in
3. प्राथमिक आरोग्य केंद्र कळसुली नोटीस बोर्ड

वैद्यकिय अधिकारी गट - अ
प्राथमिक आरोग्य केंद्र कळसुली
ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग

Scanned with OKEN Scanner